# वार्तापत्र

पोलीस अधिक्षक कार्यालय
गडचिरोली दिनांक २१/०६/२०१८

## गडचिरोली पोलीस मुख्यालयात‘ जागतिक योग दिन' साजरा

‘जागतिक योग दिनाचे’ औचित्य साधत गडचिरोली पोलीस दलाच्या वतीने योग प्रशिक्षक, श्री संजय देशमुख, सौ. वर्षाताई देशमुख, श्री. अथर्व गोहणे यांच्या मार्गदर्शनाखाली ‘योग अभ्यासाचे’ आयोजन पोलीस मुख्यालय गडचिरोली येथील मुख्य कवायत मैदानावर आज सकाळी ०६.०० वाजता करण्यात आले होते.

कार्यक्रमाची सुरवात मा. श्री. डॉ. अभिनव देशमुख, मा. श्री. डॉ महेश्वर रेड्डी, मा. श्री हरी बालाजी, मा उपविभागीय पोलीस अधीकारी समीरसिंह साळवे यांचे प्रमुख उपस्थितीत दीपप्रज्वलनाने झाली.

सदर ‘योग अभ्यास’ कार्यक्रमास गडचिरोली पोलीस दलातील २० अधिकारी ४५० कर्मचारी यांनी सहभाग नोंदविला. यावेळी सौ. वर्षा देशमुख यांनी ‘योग दिनाचे’ महत्व विशद करत उपस्थित सर्वांना योग अभ्यासाचे धडे दिले.

‘
“